## प्रेसनोट

## राष्ट्रमाता जिजाऊ यांची जंयती

जा.क्र. २३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०१/२०१८

भंडारा:— पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. १२/०१/२०१८ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधिक्षक(गृह) कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिव**ण** चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

जिजाऊ यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ ला सिंधखेडराजा जिल्हा बुलढाणा येथे झाला. त्याचे आईचे नाव म्हाळसाबाई जाधव असे होते. इ.स. १६१० रोजी शहाजी राजाची पत्नी म्हणुन जिजाऊनी पहीले पाऊल भोसले राजघराण्यात टाकले. १९३० मध्ये शिवबाचा जन्म झाला, शहाजी जिजा शिवबा हे जणु महाराष्ट्राला पडलेले गोड स्वप्नच शहाजींच्या मृत्य नंतर सती न जाता शिवबाचा आधारखंड म्हणुन त्याच्या पाठीशी उभी राहणारी जिजाऊ दृष्टी धाडसी माताच ठरत नाही, तर सती प्रथे सारख्या क्रूर,अमानवीय,अज्ञानवादी प्रथेवर कुठाराघात करणारी व सती प्रथेला विरोध करुन सती प्रथा संपविणारी पहीली थोर समाज सुधारक ठरते. त्यांचे अफाट धैर्य, शौर्य, पराक्रमाचे मुर्तीमंत प्रतीक, मानवताची श्रेष्ठ पुरस्कर्ती, स्त्री उन्नयनाची व स्त्री सन्मानाची उद्‌गाती राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मॉ. साहेब यांची जयंती. आज साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. घुसर स्थागुशा स्थागुशा भंडारा, पोनी. गाडे वानीशा भंडारा, सपोनी. कदम मानवी संसाधन विभाग भंडारा, सपोनी. काळे स्थागुशा भंडारा, पोउपनी. आडोळे पोलीस मुख्यालय, आर.सी पी. क्यु. आर.टी. राखीव पोलीस निरीक्षक पोनी. वर्मा, उपनिरीक्षक प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.